## दिनांक 09/04/2025

**1.** श्रीवर्धन पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/04/2025 रोजी 19:10 वा च्या सुमारास मौजे मेटकर्णी, श्रीवर्धन, मौजे फिर्यादी व आरोपीत रा.मेटकर्णी ता.श्रीवर्धन याच्यात बाचाबाची झाल्याच्या कारणावरुन आरोपीत हा फिर्यादी याचे घरासमोर येवुन फिर्यादी याचे आईच्या डोक्यात तेथे असलेला दगड हातात घेवुन डोक्यात मारुन दुखापत केली आहे.

याबाबत श्रीवर्धन पोलीस ठाणे गुरनं.25/2025, भा.न्या.सं.2023 चे 118(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई सुधाकर लहाणे, हे करीत आहेत.

**2.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/04/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास मौजे रा. दादर हापशिर आळी देवाचे मंदीर समोर, पेण, येथे फिर्यादी रा. दादर हापशिर आळी ता पेण हे यात्रेत जात असताना हापशिर मंदीराजवळ आले वेळी आरोपीत यांनी फिर्यादीस उद्देशून ये चोरा इकडे ये असे म्हाणाले म्हणुन फिर्यादी यांनी विचारले की तु मला चोर का बोललास? या गोष्टीचा मनात राग धरून आरोपीत नंबर 1 रा. दादर हापशिर आळी ता पेण याने फिर्यादीस हाताचे ठोस्याने मारहाण केली व आरोपीत नं 2 याने हातातील कडयाने भुवई वर दुखापत केली तसेच आरोपीत नं 3 याने लाकडी दांडका डोक्यात मारुन दुखापत केली तसेच आरोपीत नं 1 ते 6 यांनी एकत्रीत येवुन गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस शिवीगाळी करून हाताबुक्यानी मारहाण केली पुन्हा मारण्याची धमकी दिली.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.14/2025, भारतीय न्याय संहिता कलम 118(1),115(2), 352,351(2), 189(1),189(2), 189(4), 191(1), 191(3), 190 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहा.फौजदार ठाकुर, हे करीत आहेत.

**3.** दादर (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/04/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास मौजे रा. दादर हापशिर आळी देवाचे मंदीर समोर, पेण येथे फिर्यादी हे यात्रेत जात असताना हापशिर मंदीराजवळ आले वेळी आरोपीत नंबर 1 व2 यांनी फिर्यादी यांची मुलगी हिचे सामेर फिर्यादी यांना उद्द्देशुन टोमणे मारले म्हणुन फिर्यादी यांनी विचारले की, तु मला का टोमणे मारतोस? या गोष्टीचा मनात राग धरुन आरोपीत नंबर 1 व 2 यांनी फिर्यादी हाताचे ठेसाने गाळावर छातीवर मुकामार मारहाण केली तसेच आरोपीत नं 1 ते 6 यांनी एकत्रीत येवुन गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीस शिवीगाळी करून हाताबुक्यानी मारहाण केली पुन्हा मारण्याची धमकी दिली.

याबाबत दादर (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.15/2025, भारतीय न्याय संहिता कलम 115(2), 352,351(2), 189(1),189(2), 191(1),190 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहा.फौजदार ठाकुर, हे करीत आहेत.

**4.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 07/04/2025 रोजी 12:30 वा च्या सुमारास मौजे माणगांव एस.टी.स्टण्ड माणगांव येथे एस.टी बस मध्ये ता माणगाव येथे एकूण 15000/- रुपये किमंतीचा रेड मी कंपनीचा मोबाईल हा कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीच्या हेतुन, स्वत:चे फायदयाकरीता फिर्यादी यांचे संमतीशिवाय चोरुन घेवुन गेला आहे.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं.77/2025, भारतीय न्याय संहिता कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/जाधव, हे करीत आहेत.

**5.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/04/2025 रोजी 00:00 वा ते दि. 08/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे धारणी गावचे हददीत आरोपीत क्र 01 व 02 रा.धामणी ता. खालापुर यांच्या मच्छी तलावावर ता.खालापुर येथे आरोपीत यांना थाई मांगुर माशांचे मत्स्य संवर्धन बंद करणेबाबत लेखी आदेश देवुन देखील मांगुर माशांचे मत्स्य संवर्धन बंद केले नाही तसेच सदरचे मांगुर मासे खाण्यासाठी अपायकारक आहेत हे माहित असतांना देखील त्याचा साठा करुन विक्री केली तसेच खराब पाणी नदीमध्ये सोडल्यामुळे लोकांच्या आरोग्याला धोका निर्माण केला व सदरच्या मत्स्य संवर्धन आजूबाजुलच्या जनतेच्या आरोग्याला सामुहिक धोका निर्माण केला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.120/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 279, 275, 293, 271, 223,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/किरण शेळके, हे करीत आहेत.

**6.** महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/04/2025 रोजी 13:45 वा च्या सुमारस मौजे शुभलाभ सोसायटीचे ए विंग बिल्डींगचे, खाली, नांगलवाडी, ता.महाड येथे आरोपीत रा.तुळसन ता.कराड जि.सातारा याने पाण्याच्या मिटरच्या जुन्या वादातुन शॉकप्सरचा स्टीलचा दांडा पिडीत यांचे डोक्यात मारुन त्यांना जिवेठार मारण्याचा प्रयत्न केला. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक दिनांक वेळ: 08/04/2025 रोजी 15:06 वा च्या सुमारस अटक करण्यात आली आहे.

याबाबत महाड (एम.आय.डी.सी.)पोलीस ठाणे गुरनं.40/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 109,352,351(3),115(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई जगदीश .गायकवाड, हे करीत आहेत.

**7.** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/11/2024 रोजी 00:01 वा ते दि. 28/02/2025 रोजी 00:01 वा च्या दरम्यान आरोपीत याने वेळोवेळी महिला फिर्यादिशी लग्न करण्याचे खोटे अमिष दाखवून आपन शारीरीक सबंध ठेवु असे बोलुन नोव्हेंबर 2024 मध्ये फिर्यादी यांना

पॅटीस खाण्यास देवुन फिर्यादी हिने पॅटीस खाल्या नंतर तिला झोप लागली व वारंवार फेब्रुवारी 2025 पर्यंत आरोपीत याने फिर्यादी यांच्याशी शारिरीक सबंध करुन लग्न न करता फसवणुक केली.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं. 33/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 69 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री अशोक मरस्कोले, हे करीत आहेत.

**8.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/04/2025 रोजी 15:30 वा च्या सुमारास मौजे मिळठाकुर वाडी गावचे हददीत जुना पुणे मुंबई हायवेवर एक्सप्रेस हायवेच्या ब्रिजखाली ता.खालापुर येथे आरोपीत चालक मु.पुयना पो.सांडस ता.कळंदुरी जि.हिंगोला याने त्याच्या ताब्यातील कंटेनर ट्रक क्र. ग्ख्र्.01.ऋए.4287 हा पुणे बाजुकडुन मुंबई बाजुकडे घेवुन जात असताना ट्रक हा अतिवेगोन, अविचाराने, हयगयीने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लेक्ष करून धोकादायक रित्या चालवुन समोर चाललेल्या फिर्यादी यांचे टुरीस्ट स्विफट डिझायर कार क्र. ग्क्त.43.एच्र्.1946 हीस ठोकर मारून अपघात करून अपघातात कार समोरील कंटेनर क्र. ग्क्त.46.एए.6726 यावर जावुन आदळुन अपघात होवुन अपघातात कार मधील प्रवासी फिर्यादी यांची आई रा.ओमगैरव सोसायटी, रूम नं-11, तिसरा मजला, शंकरा मदीर जवळ, कुळगाव बदलापुर ईस्ट यांना साध्या दुखापतीस व वरील वाहनांचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.98/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988चे कलम 184, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 281,125(a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अमोल धायगुडे, हे करीत आहेत.

**9.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/04/2025 रोजी 14:00 वा च्या सुमारास मौजे अलिबाग रिलायन्स पेट्रोल पंप समोरील बिकानेर स्विट मार्ट ता अलिबाग येथे फिर्यादी रा. प्लॅट नं 208, सद्‌गुरू बिल्डींग, सेंट मेरी स्कुलच्या समारे श्रीबाग नं 2, ता अलिबाग व त्याचे काका दुकानात असताना इनोव्हा गाडी क्रमांक एमएच 43/एएफ/0294 यामधुन दोन इसम हे फिर्यादीचे दुकानात आले व त्यांनी त्याचे काका यांना माझा कामगार कोठे आहे? असे विचारले म्हणुन त्याचे काका यांनी कामगार बाहेर गेला आहे असे सांगितले असता सदर इसमापैकी काळ्या रंगाच्या फुल हाताच्या टि शर्ट घातलेल्या इसमाने फिर्यादीचे काकांकडे तुम्हाला इथे धंदा करायचा असेल तर तुम्हाला पाच लाख रूपये दयावे लागतील नाहीतर दररोज वेगवेगळे ग्राहक यांना खराब माल दिला असा बनाव बनवु व सोशल मिडीयावर बदनामी करून तुमचा धंदा बंद करू. आम्ही अशी कोणतीही कारवाई करू नये असे तुम्हाला वाटत असेल तर गुपचुप 5 लाख रूपये देवुन मॅटर संपवुन टाका नाहीतर तुझे कामगाराला आमचे समक्ष हजर करा त्याला नाही पुन्हा राजस्थान ला पाठविला तर पहा असे बोलू लागले. अशी खंडणी मागुन ती नाही दिली तर तुझे कामगाराला हजर कर असे बोलले असता फिर्यादीचे काका यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने त्या इसमाने फिर्यादीचे काका याच्या कानाखाली मारून त्यांना शिविगाळ केली. तसेच

त्यांच्या पैकी एका इसमाने त्यांच्या फोनवरून फोन करून आरोपित क्र 01 व 02 या इसमास बोलावुन घेवुन व अन्य एक इसम याच्या सोबत सफेद रंगाची क्रेटा कार मधुन फिर्यादीचे दुकानात आला व त्याने फिर्यादीचा कामगार याच्या सोबत बोलाचाली करून त्याच्या कानाखाली मारली त्यावेळी फिर्यादीची काकी यांनी त्यांना विचारणा केली असता आरोपित क्र 02 याने तिला देखील शिविगाळ केली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.62/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 308(3), 352, 351(2),115(2),189(2),191(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री संतोष भुंडेरे, हे करीत आहेत.

**10.** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/04/2025 रोजी 16:30 वा च्या सुमारास मौजे कोपरी गावचे हददीत असलेल्या फिर्यादीचे यांचे शेतावर, अलिबाग येथे फिर्यादी यांचा मुलगा, रा. शिवाजीनगर कुर्डुस रा शिहू असे कुर्डुस गावचे हददीत असलेल्या कोपर येथे फिर्यादीचे मालकीचे शेतामधील तलावा मध्ये मच्छी काढण्याकरीता गेले असता सायंकाळी 04.30 वाजण्याच्या सुमारास आरोपीत व त्याची पत्नी रा. कोपरी कुर्डुस पो कुर्डुस ता.अलिबाग हे तेथे येवून आरोपीत याने फिर्यादी यांना माझ्या शेतातुन माती का काढलीस असे बोलून शिविगाळी करून खाली पडलेला दगड उचलुन फिर्यादी यांचे डावे पायाचे डोळयावर मारून दुखापत केली तसेच त्याच्या हाताच्या पंज्जावर उपट मारून दुखापत केली व फिर्यादी यांना मारण्याची धमकी दिली तसेच आरोपीत 2 यांनी संगणमत करून फिर्यादी यांना शिवीगाळी केली केली.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं.34/2025, भा न्या संहिता कलम 118(1), 115(2), 352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/सुष्मा जांबरे, ह्या करीत आहेत.

**11.** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/04/2025 रोजी 16:30 वा च्या सुमारास मौजे कोपरी गावचे हददीत असलेल्या फिर्यादीचे यांचे शेतावर, अलिबाग येथे फिर्यादी कोपर येथे फिर्यादीचे मालकीचे शेतावर फेरी मारण्यासाठी गेले असता तेथे फिर्यादी याचा आरोपीत क्रमांक 01 भाउ याने माती काढुन त्याचे शेत तळयावर टाकली म्हणून फिर्यादी यांनी आरोपीत क्रमांक 01 यास, तु माझे शेतातुन माती का काढलीस? असे बोलले असता आरोपीत क्रमांक 01 हा त्याच्या तळयातुन बाहेर येवून फिर्यादी यांस शिवीगाळी करून भेंडीच्या लाकडाच्या दांडक्याने फिर्यादी यांचे डावे मनगटावर उपट मारून तसेच उजवे मांडीवर भेंडीच्या लाकडाच्या दांडक्याने मारहान करून दुखापत केली तसेच आरोपीत क्र 02 याने फिर्यादी याचा घसा धरून खाली पाडले तसेच विरोधक नं 1,2 यांनी संगनमत करून फिर्यादी यांस हाताबुंक्याने मारहान करून ठार मारण्याची धमकी दिली.

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं. 35/2025, भा न्या संहिता कलम 118(1),115(2), 352,351(2), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/ सुष्मा जांबरे, ह्या करीत आहेत.

**12.** रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 05/04/2025 रोजी 12:15 वा च्या सुमारास मौजे वरोंडा ता.अलिबाग येथे आरोपीत यांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन मागील भाडनांचा राग मनात धरून महिला फिर्यादी याच्या घरात घुसुन आरोपीत क्र 1 रा वरांडे पाडा पो नागाव याने फिर्यादीस हाता बुक्याने मारहाण करून स्त्री जातीस मनात लज्जा उत्पन्न हाईल असे कृत्य केले तसेच आरोपीत क्र 2 ते 4 यांनी डोळयात लाल मसाला टाकुन आरोपीत क्र 3 हिने साक्षीदार यांना डोळयात मसाला टाकुन हाताबुक्याने मारहान करून आरोपीत क्र 4 हिने लाकडी दांडक्याने मारहाण केली व आरोपीत क्र 1 ते 5 यांनी केस मागे घेण्याची धमकी दिली.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं. 39/2025, भारतीय न्याय सहीता 2023चे कलम 189 (2)(4) ,190,74, 333,118(1),115(2),352,351(2),3 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ मिलींद जनार्दन सुर्वे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 08.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 249 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,50,500/-रुपये इतका दंड आकारला आहे.